## MAHARASHTRA ACT No. XLIII OF 1975

## THE MAHARASHTRA SPECIFIED CO-OPERATIVE SOCIETIES (POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO EMERGENCY) ACT, 1975

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ५ सप्टेंबर १९७५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. खोत्रे,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLIII OF 1975

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO COMMITTEES OF SPECIFIED CO-OPERATIVE SOCIETIES DURING THE PERIOD OF THE EMERGENCY DECLARED ON THE 25TH DAY OF JUNE 1975

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १६ सप्टेंबर १९७५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

### सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३

**दिनांक २५ जून १९७५ रोजी घोषित केलेल्या आणीबाणीच्या कालावधीमध्ये विनिर्दिष्ट सहकारी संस्थांच्या समित्यांची निवडणूक लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३-ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या सहकारी संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांच्या निवडणुका जिल्हाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली घेणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** ज्यांची मुदत संपलेली आहे किंवा ज्यांची मुदत संपत आलेली आहे, अशा विनिर्दिष्ट संस्थांच्या निवडणुका किंवा पोट-निवडणुका निकटच्या भविष्यकाळात घेणे आवश्यक आहे, आणि काही निवडणुका प्रथमतःच घेणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २५ जून १९७५ रोजी घोषित केलेल्या आणीबाणीच्या कारणास्तव अशा निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असलेले जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांना, आणीबाणीच्या कालावधीमध्ये हाती घ्यावयाच्या इतर कार्यक्रमासाठी सर्व प्रयत्न करणे आवश्यक आहे, आणि त्याचा परिणाम म्हणून, निवडणुकीच्या कामासाठी ते उपलब्ध होणार नाहीत ; आणि अशा कालावधीमध्ये सर्वसाधारणपणे अशा निवडणुका घेणे हे अशा संस्थांच्या सदस्यांसाठीसुद्धा गैरसोयीचे होणार आहे ;

**आणि ज्याअर्थी,** ह्या आणि इतर कारणांसाठी विनिर्दिष्ट संस्थांच्या अशा निवडणुका व पोट-निवडणुका लांबणीवर टाकणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी**, अशा रीतीने (निवडणुका) लांबणीवर टाकण्याचा परिणाम म्हणून, समित्यांच्या काही सदस्यांच्या आणि त्यांच्या प्रशासकांच्या पदाचा कालावधी वाढवणे आणि पूर्वोक्त बाबींच्या संबंधातील प्रयोजनांकरिता तरतूद करणे आवश्यक आहे; **त्याअर्थी**, याद्वारे, भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (आणीबाणीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ असे म्हणता येईल.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

(३) तो भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३५२, खंड (१) अन्वये, २५ जून १९७५ रोजी काढण्यात आलेल्या आणीबाणीच्या उद्घोषणेच्या अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये आणि त्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी, किंवा राज्य शासन **शासकीय राजपत्रामध्ये** अधिसूचित करील अशा त्यापूर्वीच्या तारखेपर्यंत अंमलात राहील. आणि त्यानंतर त्याची मुदत समाप्त होईल. तो अधिनियम जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारेच रद्द झाला असे समजून या अधिनियमाची मुदत समाप्त झाल्यानंतर मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ यास लागू होईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात—

(अ) "प्रशासक", "समिती" आणि "संस्था" यांचे अर्थ, सहकारी संस्था अधिनियमामध्ये त्यांना जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच असतील ;

(ब) "विनिर्दिष्ट संस्था" म्हणजे सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७३-ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारांतील कोणत्याही प्रकारची संस्था ;

(क) "सहकारी संस्था अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० ;

(ड) "आणीबाणी" म्हणजे भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३५२ च्या खंड (१) अनुसार काढलेल्या आणीबाणीच्या उद्घोषणेन्वये दिनांक २५ जून १९७५ रोजी घोषित केलेली आणीबाणी.

विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे आणि सदस्यांचा पदावधी वाढवून देणे इत्यादी. ३. (१) सहकारी संस्था अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम व उपनियम किंवा महाराष्ट्राचा उभारणी होत असलेल्या सहकारी साखर कारखान्याबाबत (निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७४ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी—

(अ) हा अधिनियम अंमलात असेपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समित्यांच्या निवडणुका होणार नाहीत किंवा समितीमधील कोणतीही नैमित्तिक रिक्त जागा भरण्यासाठी निवडणूक होणार नाही,

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस, जे सदस्य विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्यांवर होते अशा सदस्यांचा (मग त्यांची मुदत यापूर्वी संपलेली असो किंवा उक्त दिनांकानंतर हा अधिनियम अंमलात असेपावेतोच्या कालावधीत कोणत्याही वेळी संपणार असो) पदावधी, यथास्थिति, वाढवून दिला असल्याचे किंवा वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल, आणि असा प्रत्येक सदस्य हा अधिनियम अंमलात असेपावेतोच्या कालावधीत पद धारण करण्याचे चालू ठेवील,

(क) कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७८ च्या पोट-कलम (१) अनुसार, नियुक्त केलेल्या व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर असलेल्या कोणत्याही प्रशासकाचा (मग त्याची मुदत यापूर्वी संपलेली असो किंवा उक्त दिनांकानंतर हा अधिनियम अंमलात असेपावेतोच्या कालावधीत कोणत्याही वेळी संपणार असो) पदावधी, वाढवून दिला असल्याचे किंवा यथास्थिति, वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल आणि असे प्रशासक हा अधिनियम अंमलात असेपावेतोच्या कालावधीत पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

(ड) जे अशा समित्यांवर नामनिर्देशित केले गेले होते आणि जे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर होते, अशा कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीवरील कोणत्याही सदस्यांचा (मग त्यांची मुदत यापूर्वी संपलेली असो किंवा उक्त दिनांकानंतर हा अधिनियम अंमलात असेपावेतोच्या कालावधीत कोणत्याही वेळी संपणार असो) पदावधी, वाढवून दिला असल्याचे किंवा यथास्थिति, वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल आणि असे सदस्य, हा अधिनियम अंमलात असेपावेतोच्या कालावधीत पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीचा/चे सदस्य यांची निवडणूक करण्यासंबंधी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी, कोणत्याही न्यायालयाने दिलेला किंवा संमत केलेला न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यावर परिणाम होणार नाही. आणि अशी निवडणूक घेण्यात येईल आणि पूर्ण करण्यात येईल आणि ही समिती न्यायालयाच्या निदेशानुसार संस्थापित केली जाईल.

४. कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या सदस्याच्या राजीनाम्यामुळे, मृत्यूमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे समितीतील कोणत्याही पदाची जागा रिक्त झाली असेल, तर अशी कोणतीही रिक्त जागा भरण्यासाठी त्या प्रत्येक विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीस त्याबाबतीत योग्य रीत्या अर्हता प्राप्त असलेल्या कोणत्याही सदस्यास स्वीकृत करून घेण्याची शक्ती असेल. *स्वीकृत करून घेण्याची शक्ती.*

५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी किंवा तदनंतर नोंदणी केलेल्या एखाद्या विनिर्दिष्ट संस्थेच्या बाबतीत, आणि ज्याबाबतीत संस्थेच्या नोंदणीच्या अर्जात सामील असलेल्या सर्व व्यक्तींची पहिली सर्वसाधारण सभा, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा तदनंतर भरणार असेल त्याबाबतीत, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम ५९ अन्वये तात्पुरत्या समितीची रचना करण्यात येईल, आणि अशा रीतीने रचना करण्यात आलेल्या तात्पुरत्या समितीचे सदस्य हा अधिनियम अमलात असेल त्या मुदतीत आपले पद धारण करतील. *तात्पुरत्या समित्यांची रचना करणे.*

६. कलम ३ अन्वये, समित्यांच्या ज्या सदस्यांच्या आणि कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी नियुक्त केलेल्या ज्या प्रशासकांच्या पदाची मुदत वाढवण्यात आली आहे असे समजले जाईल किंवा यथास्थिति, ती वाढवण्यात आली असेल, अशा बाबतीत, ते सर्व सदस्य आणि ते सर्व प्रशासक हे असा सदस्य, किंवा यथास्थिति, प्रशासक म्हणून त्यांच्या सर्व शक्तींची त्या सर्व वाढवलेल्या मुदतीतही अंमलबजावणी करण्यास आणि त्याप्रमाणे सर्व कर्तव्ये आणि कामे पार पाडण्यास सक्षम असतील, आणि उक्त मुदतीत अशा कोणत्याही समितीने, सदस्याने किंवा प्रशासकाने केलेली कोणतीही कृत्ये ही, अशा पदाची मुदत वेळेच्या आत वाढवण्यात आली नव्हती किंवा ती अन्यथा योग्य रीत्या वाढवली नव्हती, अथवा वाढवलेल्या मुदतीच्या कालावधीत अशा समितीला, सदस्याला किंवा यथास्थिति प्रशासकाला समितीच्या, सदस्याच्या किंवा प्रशासकाच्या शक्तींची अंमलबजावणी करता आली नाही किंवा त्यांची सर्व कर्तव्ये आणि कामे त्यांना पार पाडता आली नाहीत, याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य आहेत असे समजले जाणार नाही किंवा त्याबाबत कोणत्याही न्यायालयात वाद दाखल करता येणार नाही. *समित्यांच्या आणि कलम ३ अन्वये ज्यांच्या पदाची मुदत वाढवण्यात आली आहे अशा सदस्यांच्या आणि प्रशासकांच्या कृत्यांचे वैधकरण.*

७. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल अशा दिनांकानंतर (आणि हा दिनांक या अधिनियमाची मुदत संपण्याच्या दिनांकापूर्वीचा राहील), संबंधित जिल्हाधिकारी विद्यमान समित्यांच्या आणि प्रशासकांच्या पदाची जी मुदत हा अधिनियम अंमलात असण्याच्या कालावधीत वाढवण्यात आली होती असे समजले जात होते ती मुदत समाप्त होण्यापूर्वी सहकारी संस्था अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम व उपविधी यांच्या उपबंधांनुसार नवीन समित्यांची रचना करण्याकरिता व्यवस्था करतील. *विद्यमान समित्या आणि प्रशासक यांची वाढवलेली मुदत समाप्त होण्यापूर्वी नवीन त्यांची करण्याची व्यवस्था करणे.*

१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम २४ लागू होणे. ८. या अधिनियमाद्वारा किंवा तदनुसार जी कोणतीही अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ती खेरीजकरून, इतर सर्व बाबतीत, सहकारी संस्था अधिनियम हा संबंधित विनिर्दिष्ट संस्थेस लागू होईल.

अडचणी दूर करणे. ९. या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना, किंवा त्यात असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कारणावरून कोणतीही अडचण उद्भवली असेल, अथवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात सहकारी संस्था अधिनियमाचे किंवा संस्थांच्या बाबतीतील कोणत्याही अन्य विधीचे उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली असेल, तर अशा बाबतीत, राज्य शासनाला प्रसंगाप्रसंगानुसार अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारा करता येईल.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम ५९ चे निरसन. १०. महाराष्ट्राचा उभारणी होत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत (निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७४, हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
प्रभारी भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.